हैदराबाद मुक्तिसंग्राम काळातील निजामांचे परराष्ट्र धोरण.

(इ.स.१७२४-१९४८)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव्य विद्या शाखा, विधी व सामाजिक शास्त्रे विद्या शाखे अंतर्गत इतिहास विषयातील विद्या वाचस्पती पदवी मिळवण्यासाठी सादर करावयाचा शोध प्रबंधाचा संक्षिप्त आराखडा.

संशोधक

पल्लवी सुरेश फुलसे

मार्गदर्शक

डॉ. संगीता संदीप शिंदे

एम.ए., पीएच डी. (इतिहास)

संशोधन मार्गदर्शक

यशवंत महाविद्यालय, नांदेड.

संशोधन केंद्र

यशवंत महाविद्यालय, इतिहास विभाग नांदेड.

डिसेंबर २०२४

प्रस्तावना :-

हे राष्ट्र देवतांचे, हे राष्ट्र प्रेषितांचे
आ-चंद्र सूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे.

भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही ऐतिहासिक घटनांची मालिका होती ज्याचा अंतिम उद्देश भारतातील ब्रिटीश राजवट संपवणे हा होता. हा लढा १८५७ ते १९४७ या काळात चालला. यामध्ये संपूर्ण भारतातून मोठ्या प्रमाणावर उत्स्फूर्तपणे लोकांनी सहभाग नोंदविला. भारतीयांचा संघर्ष ब्रिटीश सत्ता दडपू शकली नाही आणि क्रांतिकारकांच्या बलिदानातून भारत; भारतीय स्वातंत्र्याचा कायदा १९४७ नुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिशांच्या राजकीय वर्चस्वातून मुक्त झाला. या कायद्यानुसार देशी राज्ये आणि संस्थानिकांनाही त्यांनी आपले राज्य भारतात किंवा पाकिस्तानात विलीन करावयाचे की, स्वतंत्र राहावयाचे या बाबतीत स्वातंत्र्य दिलेले होते. त्यामुळे देशी राज्ये व संस्थाने भारतीय संघराज्यात कशी विलीन करून घ्यावयाची हा मोठा प्रश्न भारत सरकारपुढे निर्माण झाला होता. शेवटी भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाला नेहरू आणि गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी बहुतेक संस्थाने भारतात विलीन करून घेतली परंतु हैदराबाद राज्याचा सत्ताधीश निजाम मीर उस्मान अली खान याने ११ जून १९४७ आपले राज्य स्वतंत्र राहणार असल्याचे जाहीर केले. यामुळे भारत सरकार आणि हैदराबाद राज्यातील जनतेपुढे मोठा पेच प्रश्न निर्माण झाला.

दक्खनच्या मध्यभागी असलेले आणि देशात आकाराने दुसऱ्या क्रमांकाचे असलेले हैदराबाद राज्य स्वतंत्र राहणे राज्यातील जनतेच्याच नव्हे तर देशाच्याही हिताचे नव्हते. हैदराबाद राज्यालाही पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त होणार नव्हते. त्यामुळे राज्यातील जनतेने हैदराबाद राज्याचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण करण्यासाठी सत्याग्रह व सशस्त्र आंदोलन केले. शेवटी १३ सप्टेंबर १८४८ रोजी भारत सरकारने हैदराबाद राज्यावर लष्करी कारवाई करून ते भारतीय संघराज्यात विलीन करून घेतले, यासाठी जे सत्यागृह व सशस्त्र आंदोलन जनतेने केले तेच “हैदराबाद स्वातंत्र्य - संग्राम” या नावाने ओळखले जाते.

आपले संस्थान स्वतंत्र ठेवण्यासाठी प्रत्येक महत्वकांक्षी राज्यकर्त्याप्रमाणे निजामाने अतोनात प्रयत्न केला. त्याने परकीय देशांकडून मदत घेतली म्हणजेच ज्या परराष्ट्र धोरणाचा वापर केला त्याचा आभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात येणार आहे .

विषय निवडीचे महत्व :-

हैदराबादचा संघर्ष राजेशाही विरुद्ध लोकशाही किंवा राजा आणि प्रजा यांच्यातील संघर्ष होता ज्यात राजा मुस्लिमांचे प्रतिनिधित्व करीत होता आणि प्रजा हिंदुत्वाचे प्रतिनिधित्व करीत होती. निजामची शासनव्यवस्थाही प्रामाणिकपनाणे सांप्रदायिक द्वेष भावना कमी करू शकली नाही आणि त्या दृष्टीने प्रयत्नही झाला नाही त्यामुळेच बहुसंख्य हिंदू जनता निजामांवर विश्वास ठेवू शकली नाही. हिंदू आणि मुसलमान हे माझे दोन डोळे आहेत म्हणून सांगणारा निजाम १९२० नंतर कट्टर सांप्रदायिक बनला याच्या परिणामाला तेव्हा सुरुवात झाली जेव्हा राज्यातील प्रजा आपल्या अधिकारांसाठी सज्ज झाली. सातवा निजाम मीर उस्मान अली इ.स. १९११ ते १९४८ पर्यंत हैदराबादेवर राज्य करीत होते. इ.स. १७७८ पासून शेवटचा निजाम मीर उस्मान अली यांच्या शासनकाळापर्यंत (इ.स.१९४८) इंग्रजांनी आपले निरीक्षक रेसिडेंट हैदराबाद राज्यात नेमलेले होते. सुरुवातीची ५४ वर्ष वगळता बाकीच्या पावणे दोनशे वर्षापर्यंत इंग्रजांच्या प्रतिनिधीच्या देखरेखीखाली पाचही निजाम राज्यकर्त्यांना केवळ सत्तेचा भोग घेण्यापलीकडे दुसरा कोणताही पर्याय नव्हता.

हैदराबादच्या सीमांना लागुनच ब्रिटीश साम्राज्याची सत्ता असल्यामुळे आणि इंग्रजांकडून हैदराबादेस संरक्षित राज्य घोषित केले गेल्यामुळे निजाम राज्यकर्ते आपल्या सीमेतच अडकून पडले होते. प्रस्तुत संशोधनातून हैदराबाद मुक्ती संग्रामाच्या काळातील निजामांचे परराष्ट्र धोरण जगाच्या समोर यावे अशी संशोधकाची भूमिका आहे. हैदराबाद राज्य ब्रिटीश राजवटीच्या अस्ताच्या वेळेपर्यंत टिकून असलेले भारतातील सर्वात मोठे स्वायत्त संस्थानिक राज्य असल्यामुळे त्याच्या आकर्षणातून हैदराबाद मुक्तिसंग्रामाच्या काळातील निजामांचे परराष्ट्र धोरण १७२४-१९४८ हा विषय निवडला आहे.

संशोधन व्याप्ती व मर्यादा :-

भारतातील जवळजवळ ५६५ संस्थानांमधील ज्याची सर्वाधिक काळ सत्ता चालली ते हैदराबाद संस्थानातील असफिया घराण्याचे राज्य होय. इ.स. १७२४ ते १९४८ पर्यंत सव्वा दोनशे वर्ष निजामाच्या आसफिया घराण्याचे राज्य हैदराबादेवर चालले. पहिला निजामुल्क असिफजाह (इ.स. १७२४ ते १७४८) आणि दुसरा मीर निजामअली (१७६२ ते १८०३) या दोघांनीच आपल्या सत्तेची स्थिरता आणि विस्तारासाठी संघर्ष केला. नंतर येणाऱ्या पाच पिढ्यांच्या शासन काळात न लढाई लढली गेली ना संघर्ष केला गेला, केवळ आपली सत्ता राखण्याचे काम बाकीच्या निजामांनी केले.

१) पहिला निजामुल्क इ.स. १७२४ ते १७४८ पर्यंत, २)दुसरा मीर निजामअली इ.स. १७६२ ते १८०३ पर्यंत, (मधली १४ वर्ष सालाबतजंग, मुज्जफरजंग आणि बसालत जंगाकडून सत्ता खेचून घेणे, सैनिकांचे बंड शमविणे आणि मराठ्यांशी लढण्यात गेली) ३) तिसरा निजाम सिकंदरजहा इ.स. १८०३ ते १८२६ पर्यंत, ४) चौथा निजाम नासिरुद्दोल्ला इ.स. १८२९ ते १८५७ पर्यंत, ५) पाचवा निजाम आफजोद्दोला इ.स. १८५७ ते १८६९ पर्यंत ६) सहावा निजाम मीर मेहबूब अली इ.स. १८६९ ते १९११ पर्यंत, ७) सातवा निजाम नासिरोद्दोला इ.स. १८२९ ते १८५७ पर्यंत.

पाचवा निजाम आफजोद्दोला इ.स. १८५७ ते १८६९ पर्यंत सहावा निजाम मीर मेहबूब आली इ.स. १८६९ ते १९११ पर्यंत सातवा निजाम मीर उस्मानअली इ.स. १९११ ते १९४८ पर्यंत हैदराबदेवर राज्य करीत होते. इ.स. १७७८ पासून शेवटचा निजाम मीर उस्मानअली याच्या शासन काळापर्यंत (इ.स. १९४८) इंग्रजांनी आपले निरीक्षक रेसिडेंट हैदराबाद राज्यात नेमलेले होते. जवळजवळ पावणे दोनशे वर्ष इंग्रजांच्या प्रतिनिधीच्या देखरेखीखाली निजामांची सत्ता चालली. संपूर्ण खर्चाचे नियंत्रण इंग्रजांचे होते. खर्चावर मर्यादा घालण्यासाठी अधिकाऱ्यास सुद्धा नियुक्त करण्यात आले होते. हे नियंत्रण शेवटच्या निजामाच्या शासन काळापर्यंत अस्तित्वात होते. हैदराबाद मुक्तिसंग्राम त्याच्याच काळात झाला. प्रस्तुत संशोधनात मराठवाड्यामध्ये झालेल्या हैदराबाद मुक्तिसंग्राम काळातील निजामाच्या परराष्ट्र धोरणाचा आभ्यास करण्यात येणार आहे. हैदराबाद

मुक्तिसंग्राम काळात निजामाचे इतर राज्ये, संघटना आणि अंतरराष्ट्रीय संस्थांशी परस्परसंवादात वापरत असलेली धोरणे आभ्यासली जाणार आहेत.

या प्रस्तुत संशोधनामध्ये मराठवाड्यातील निजाम कालखंडातील पाच जिल्हे असून सध्या आठ जिल्ह्याच्या अनुषंगाने हैदराबाद मुक्तिसंग्राम काळातील निजामांचे परराष्ट्र धोरणांचा आभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :-

प्रस्तुत संशोधनात विषय निवडण्याचे उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत-

१. निजामाचा पुर्वैतिहास आभ्यासणे (मध्ययुगीन आणि आधुनिक इतिहास) .

२. हैदराबाद संस्थानचे सात निजाम यांचा राजकीय आणि आर्थिक इतिहास आभ्यास करणे.

३. स्वातंत्र्यलढ्यात हैदराबाद संस्थानचे योगदान याचा आभ्यास करणे.

४. इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज, डच व निजाम यांच्यातील संरक्षण आणि सुरक्षा , आयात निर्यात धोरण [आर्थिक लाभ यांचा आभ्यास करणे.

५. इतर राज्ये, संघटना आणि आंतरराष्ट्रीय संस्थांशी परस्पर संवादात वापरत असलेल्या धोरणांचा व कृतींचा आभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके :-

प्रस्तुत संशोधनात खालील गृहीतके मांडण्यात आलेली आहेत.

१. हैदराबाद संस्थानची मुक्ती भारतीय इतिहासातील एक सोनेरी पृष्ठ आहे.

२. हैदराबाद राज्याची सुरक्षा व्यवस्था, पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाची नियुक्ती इत्यादीवर इंग्रजांचा अधिकार चालत असे.

३. हैदराबाद मुक्तिसंग्राम काळातील निजामास परराष्ट्र धोरणातील निर्णय आणि कृतींमध्ये स्वायत्तता आणि स्वातंत्र्य राखता येत नव्हते.

४. हैदराबाद मुक्तिसंग्राम काळात निजामाच्या परराष्ट्र धोरणावर पहिले (१९१४-१९१८) व दुसरे महायुद्ध (१९३९-१९४५) हे परिणाम करत होते.

५. हैदराबाद मुक्तिसंग्राम काळात निजामाच्या परराष्ट्र धोरणावर देशाअंतर्गत राजकारण आणि जनमत, इतर राज्यांची धोरणे आणि वर्तन अंतरराष्ट्रीय व्यवस्था यांचा प्रभाव होता.

संशोधन पध्दती :-

सदर विषयाच्या संशोधनासाठी प्राथमिक साधने म्हणून तात्कालीन उपलब्ध अप्रकाशित व प्रकाशित मराठी, हिंदी, इंग्रजी साधनाचा वापर केला जाणार आहे. हैदराबाद मुक्तिसंग्राम काळातील वर्तमानपत्रे, साप्ताहिके सहभागी असलेले लेख इत्यादी साधनांचा वापर करून संशोधन करण्यात येणार आहे. सर्वेक्षण पध्दत, विश्लेषणात्मक पध्दत, मुलाखत पध्दत, प्रश्नावली पध्दत यांचा वापर करून सदरचे संशोधन पूर्ण केले जाईल.

प्रस्तुत संशोधनामध्ये वृत्तपत्रे, रोजनिशी आत्मचरित्र प्रकाशित व अप्रकाशित ग्रंथ इत्यादी प्राथमिक तसेच दुय्यम साधनांचा वापर करून संशोधन कार्य पूर्ण करण्यात येणार आहे.

पूर्व संशोधनाचा आढावा :-

इतिहासाची व्याख्या करत असताना इतिसाचा जनक हिरोडोटस असे म्हणतो की, भूतकाळातील घडलेल्या विविध घटनांचे निपक्ष्यपाती वर्णन म्हणजेच खरा इतिहास होय, त्याचप्रमाणे भारतीय इतिहासाचा विचार करता महाराष्ट्रातील मुख्यतः मराठवाड्यातील जनतेचा विचार करता, भारतीय स्वातंत्र्य चळवळी बरोबरच मराठवाडा मुक्तिसंग्रामातील लोकांच्या कार्याचे महत्व हे अनन्यसाधारण आहे. म्हणून मी हैदराबाद मुक्तिसंग्राम काळातील

निजामांचे परराष्ट्र धोरण (१७२४-१९४८) हा विषय निवडला आहे. माझ्या या विषयासंदर्भात खालीलपैकी अनेक लोकांनी आपले संशोधन प्रकाशित केले आहेत.

१. Hyderabad freedom struggle या पुस्तकात संशोधक डॉ.बी.एस. डेंगळे यांनी प्रत्येक जिल्ह्यात झालेल्या महाराष्ट्र परिषदा, झेंडा सत्याग्रह आर्य समाज, १९४२ चळवळ, संस्थानातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक परिस्थितीचे विस्तृत विवेचन केले आहे.

२. डॉ. संगीता संदीप शिंदे यांनी हैदराबाद मुक्तिसंग्राम शेतकरी व शेतमजुरांचा सहभाग १९४२-१९४८ याचे वर्णन केले आहे.

३. डॉ.एस. बोडके जुने लातूर आणि उस्मानाबाद मधील आर्य समाजाने केलेल्या कार्याचे वर्णन केले आहे.

४. "मराठवाडा मुक्तिसंग्राम" या पुस्तकात संशोधक आण्णासाहेब वाघमारे यांनी तत्कालीन काळातील लातूर, बीड, औरंगाबाद, नांदेड येथील जनतेने निजामअलीच्या कट्टर धार्मिक गोष्टीला कशाप्रकारे विरोध केला याचे वर्णन आलेले आहे.

५. "हैदराबाद स्वातंत्र्यसंग्राम" या संशोधनपर पुस्तकात वसंत पोतदार यांनी तत्कालीन काळातील घटनांचे सविस्तर वर्णन केलेले आहे.

६. एन. डी. आंबोरे यांनी नांदेड मधील निजाम काळातील शैक्षणिक परिस्थितीचे सविस्तर वर्णन केलेले आहे.

७. "दैनिक मराठवाडा या वृत्तपत्राची भूमिका एक चीकीस्तसक अभ्यास" या संशोधनात संशोधक देवर्षी मुकुंद अविनाश यांनी मराठवाडा

मुक्तिसंग्रामातील वृत्तपत्राचे कार्य कशाप्रकारे होते यांची माहिती दिलेली आहे.

८. डॉ. काशिनाथ चाव्हान यांनी हैदराबाद मुक्तिसंग्राम बीड जिल्ह्यातील झालेल्या चळवळीचे सविस्तर वर्णन केलेले आहे.

९. “हैदराबाद स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा” या संशोधनपर पुस्तकात अनंत भालेराव यांनी रझाकार संघटनेने मराठवाड्यातील जनतेवर केलेल्या अन्यायाचे सविस्तर वर्णन केलेले आहे.

१०. “मराठवाडा १९४८ मुक्तिसंग्रामाचा शोध” या संशोधनात संशोधक कौस्तुभ दिवंगावकर यांनी तत्कालीन काळातील अनल्स इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

हैदराबाद मुक्तिसंग्रामाच्या अनुषंगाने जरी वरील साहित्य प्रकाशित झाले असले किंवा संशोधन झाले असले तरी माझ्या संशोधनातील हैदराबाद मुक्तिसंग्राम काळातील निजामांचे परराष्ट्र धोरण (१७२४-१९४८) हा विषय केंद्रस्थानी ठेवून संशोधन झालेले आढळून येत नाही.

संशोधन आराखडा :-

सदर शोध प्रबंधाची विभागणी खालील प्रकरणामध्ये करण्यात येईल.

प्रकरण योजना :-

१. हैदराबाद मुक्तिसंग्रामातील निजामांची ऐतिहासिक पार्श्वभूमी. (मध्ययुगीन आणि आधुनिक) ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा.

२. हैदराबाद मुक्तिसंग्राम (निजाम) काळातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक राजकीय शैक्षनिक सांस्कृतिक परिस्थिती.

३. निजामाच्या अंतर्गत व परराष्ट्रीय धोरणांचा ऐतिहासिक अभ्यास.

४. निजाम कालीन (मराठवाड्यात) राबवली गेलेली आर्थिक धोरणांची व योजनांची माहिती.

५. निष्कर्ष व शिफारशी.

1. हैदराबादच्या निजामांची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

मीर उस्मान अलीखान बहादूर यांच्या पूर्वीच्या सहा पिढ्यांनी हैदराबाद राज्यावर सत्ता गाजविली होती. द गोल्डन बुक ऑफ इंडिया (१८९३) मधील सर रोपर लेथब्रिजच्या म्हणण्यानुसार निजाम हे इस्लामिक संदेष्टा मुहम्मद यांचे उत्तराधिकारी पहिला खलिफा अबू बकर यांचे वंशज आहेत. भारतातील निजामांचे घराणे समरकंद येथील पर्शियन आबिद खान यांचे वंशज आहे, ज्याचा वंश इराणमधील सुफी शिहाब-उद-दीन-सुहरावर्दी यांच्याकडे आहे. हैदराबादची निजामशाही ही निजाम उल मुल्क याने स्थापन केली. ती १७२४ साली. निजामशाही टिकून राहिली ती हैदराबाद संस्थान १९४८ मध्ये स्वतंत्र भारतात विलीन होईपर्यंत. या प्रकरणात निजामांच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीची सविस्तरपणे मांडणी करण्यात येणार आहे.

2. हैदराबाद मुक्तिसंग्राम (निजाम) काळातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, परिस्थिती :-

हैदराबाद संस्थानात स्त्रियांचे स्थान अतिशय हीन दर्जाचे होते. बालविवाह, बालविधवा, अंधश्रद्धा, अज्ञान, निरक्षरता, दारिद्र्य, कुपोषण, राजकीय व सामाजिक जागृतीचा अभाव, पडदापद्धती अशा अनेक रूढी-परंपरांच्या विळख्यात ती अडकली होती. इस्लामी संस्कृती व परंपरेचा फार मोठा प्रभाव स्त्रियांवर होता. हैदराबाद राज्य ब्रिटीश राजवटीच्या असताच्या वेळेपर्यंत टिकून असलेले भारतातील सर्वात मोठे स्वायत्त संस्थानिक राज्य होते. सध्याचा तेलंगना मराठवाडा, उत्तर कर्नाटक, विदर्भाचा काही भाग तसेच भारताच्या दक्षिण मध्य भागात या संस्थानाची व्याप्ती होती. इ.स.१७२४ पासून इ.स.१९४८ पर्यंत निजाम हैदराबाद राज्याचे संस्थानिक होते. स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रदीर्घ लढ्यानंतर हैदराबाद मुक्ती संग्रामचा शेवट इ.स.१९४८ मध्ये

भारत सरकारने निजाम शासनाविरुद्ध केलेल्या पोलीस कारवाईने झाला आणि हैदराबाद संस्थान स्वतंत्र भारत देशात समाविष्ट झाले.

प्रस्तुत प्रकरणात हैदराबाद मुक्ती संग्रामाच्या काळातील (निजामांचे) सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक परिस्थितीच्या अनुषंगाने सविस्तर मांडणी करण्यात येणार आहे.

3. निजामांच्या अंतर्गत व परराष्ट्रीय धोरणांचा ऐतिहासिक आभ्यास :-

परराष्ट्र धोरणाचा आभ्यास राज्यांच्या परस्पर संवादामागील कारणे आणि पद्धतींचा आभ्यास करतो. जेंव्हा इस्ट इंडिया कंपनीने भारतीय उपखंडावर वर्चस्व मिळवले तेंव्हा त्यांनी निजामांना ग्राहक राजे म्हणून त्यांच्या संस्थानावर राज्य करण्याची परवानगी दिली. १७ सप्टेंबर १९४८ पर्यंत हैदराबाद राज्यावर निजामांनी अंतर्गत सत्ता कायम ठेवली. १९५१ पर्यंत या राज्याचे चलन हैदराबादी रुपया म्हणून ओळखले जात होते. भारतीय नागरी सेवेने प्रेरित होऊन निजमांनी स्वतःची स्थानिक हैदराबाद नागरी सेवा स्थापन केली १९४७ मध्ये भारताच्या फाळणीच्या वेळी ब्रिटीश सरकारने उपखंडातील ५६५ संस्थानांना भारत किंवा पाकिस्तान यापैकी एकात प्रवेश करण्याचे किंवा स्वातंत्र राहण्याचे पर्याय देऊ केले. भारत किंवा पाकिस्तानच्या अधिराज्यात सामील न होता निजामाने स्वतंत्र राज्य घोषित केले. ब्रिटीश कॉमनवेल्थ मध्ये स्वतंत्र राजेशाही बनण्याचा प्रयत्न केला. संशोधन कार्यातील हे प्रकरण महत्वाचे असून परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे वैविध्यपूर्ण आणि एकमेकांशी जोडलेली आहेत. ते या प्रकरणात सविस्तर मांडण्यात येणार आहे.

४. निजाम कालीन (मराठवाड्यात) राबवली गेलेली आर्थिक धोरणांची व योजनांची माहिती :-

२००८ च्या फोर्ब्सच्या सर्वकालीन श्रीमंताच्या यादीनुसार निजाम मीर उस्मान आली खान हे आकडेवारीनुसार रेकॉर्ड केलेल्या इतिहासातील पाचव्या क्रमांकाचे श्रीमंत व्यक्ती होत. निजामांनी घराण्याच्या नावावर अनेक संस्था स्थापन केल्या ज्यात रुग्णालये, शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे यांचा समावेश होता. ज्यात उर्दूचे शिक्षण दिले जाते. निजामांनी उस्मानसागर आणि हिमायत सागर जलाशय यांसारखे अभियांत्रिकी प्रकल्प, हैदराबादला रेल्वे नेटवर्क, विविध उद्योग धंदे आणि व्यवसाय

उभारले या प्रकरणात निजाम कालीन मराठवड्यात राबवली गेलेली आर्थिक धोरण व योजनांच्या अनुषंगाने सविस्तर मांडणी करण्यात येणार आहे.

५. निष्कर्ष व शिफारशी :-

वरील प्रकरणाचा अभ्यास करून येणारे निष्कर्ष या प्रकणात मांडण्यात येणार आहेत. तसेच या निष्कर्षांशी निगडीत असलेल्या शिफारशी ही या प्रकरणात शेवटी करण्यात येणार आहेत.

संदर्भसूची :-

१. डॉ. संगीता संदीप शिंदे, हैदराबाद मुक्ती संग्रामकाळातील मराठवाड्यातील शेतकरी व शेतमजुरांचा सहभाग (१९४२-१९४८).

२. डॉ.एस. बोकडे जुने लातूर आणि उस्मानाबाद मधील आर्य समाजाने केलेले कार्य.

३. लक्ष्मीकांत देशमुख एवं वि. ल. धारूरकर मुक्तीसंग्राम.

४. श्यामलाल राठोड मुक्तीसंग्राम मे नांदेड.

५. लेखक विराज निजामशाही पर पहली चोट.

६. पी. व्ही. नरसिंहराव स्वामी रामानंद तीर्थ चरित्र व कार्य.

७. चंद्रशेखर लोखंडे मराठवाडा मुक्ती लढा.

८. Dr B.S. Dhengle Hydrabad freedom struggle.

९. K. M. Munshi The end of An Era.

१०. डॉ. काशिनाथ चाव्हान, हैदराबाद मुक्तिसंग्रामातील बीड जिल्ह्यातील झालेल्या चाळवळी.

११. एन.डी. आंबोरे, नांदेड मधील निजाम काळातील शैक्षणिक परिस्थिती.

पं. नरेंद्र हैदराबाद का स्वाधीनता संघर्ष.

१२. प्रा.सौ. शोभा कोरणे हैदराबाद मुक्तीसंग्राम ऑपरेशन उमरी बँक ३० जानेवारी १९४८.

१३. वसंत ब. पोतदार हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम .

१४. अर्जुन जाधव मुक्तीची पाहट.

दुय्यम स्त्रोत :-

१. फारुकी सलमा अहमद (२०११), मध्ययुगीन भारताचा सर्वसमावेशक इतिहास. बारावे ते मध्य-अठरावे शतक पिअरसन एजुकेशन इंडिया.

२. लोकसत्ता लेख १७ सप्टेंबर २०१८ आणि २०२०.

३. मराठवाडा वृत्तपत्र .

४. अमर उजाला.

५. निजाम विजय पत्रिका.

६. साप्ताहिक वैदिक आदर्श.

७. https://scholar.google.com.

८. https://www.goodreads.com.

९. https://m.timesofindia.com.

१०. https://www.bookseeks.in

संशोधन कार्य करताना वापरण्यात येणाऱ्या सर्व संदर्भ साधनांचा समावेश शोधप्रबंधाच्या संदर्भसूचीमध्ये करण्यात येणार आहे.

परिशिष्टे :-

संशोधन करताना वापरलेली प्रश्नावली, घेतलेल्या मुलाखती, फोटो हस्तलिखिते इत्यादी घटकांचा समावेश शोधप्रबंधाच्या शेवटी परिशिष्टामध्ये करण्यात येणार आहे.

(नोट- साधनांच्या आधारावर संशोधनाच्या महितीमध्ये गरज पडल्यास बदल करण्यात येईल).

संशोधक
पल्लवी सुरेश फुलसे

मार्गदर्शक
डॉ. संगीता संदीप शिंदे